# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

**MARATHI**

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

REACHING NATIONS

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

**Editor : S. SAM SELVA RAJ** | **16 Languages** | **Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE**

VOL: XXVII — YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2025 MAY — No. 04


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**यशया ५६:१-५**

१. यहोवा असे म्हणतो, तुम्ही न्याय पाळा आणि न्यायीपण आचरा, कारण माझे तारण यायला व माझे न्यायीपण प्रगट व्हायला जवळ आहे.

२. जो मनुष्य हे करतो आणि जो मनुष्याचा मुलगा हे धरून राहतो, जो शब्बाथ न बाटवता पाळतो, आणि कोणतेही दुष्कर्म करण्यापासून आपला हात आकळून धरतो तो आशीर्वादित आहे.

३. आणि जो परका यहोवाशी जडला आहे त्याने म्हणू नये की, यहोवा आपल्या लोकांपासून मला वेगळे करील; आणि षंढानेही म्हणू नये की, पाहा, मी वाळलेले झाड आहे.

४. कारण जे षंढ माझे शब्बाथ पाळतात, आणि मला आवडणाऱ्या गोष्टी निवडतात आणि माझा करार धरून राहतात त्यांच्याविषयी यहोवा असे म्हणतो,

५. त्यांना आपल्या घरात व आपल्या कोटांच्या आत स्मारक देईन, व जे नाव मुलगे व मुली यांच्यापेक्षा अधिक उत्तम आहे ते देईन; जे छेदून टाकले जायचे नाही ते सनातन नाव मी त्यांना देईन.

# जर तुम्ही आव्हानांना तोंड देण्यास पुरेसे सक्षम असाल, तर सावध असा!

IF YOU ARE STRONG ENOUGH TO FACE CHALLENGES, **BE CAREFUL!**

सिस्टर एंजेल



**एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीज**च्या आमच्या सर्व विस्तारित कुटुंबातील सदस्यांना शुभेच्छा!

देव आपला पिता आणि प्रभु येशू ख्रिस्त याजकडून तुम्हाला कृपा आणि शांति असो.

अलीकडेच माझा पासपोर्ट हरवला. मी सर्वत्र शोधला पण सापडला नाही. त्यामुळे मी अस्वस्थ होते. मी ते कोणत्या ठिकाणी हरवले होते ते मला माहित होते, पण जेव्हा मी तिथे शोधायला गेले तेव्हा तिथे ते सापडले नाही. मी प्रत्येक काना कोपरा शोधला, परंतु न सापडल्यामुळे मी चिंतेत पडले. माझ्या विचारांमध्ये केवळ तो हरवलेला पासपोर्ट होता. मी जागे असताना किंवा झोपेत असताना इतर कोणत्याही गोष्टीवर लक्ष केंद्रित करू शकत नव्हते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मला त्याची तातडीने गरज होती. नवीन पासपोर्टसाठी अर्ज करण्यासाठी किंवा नंतर आपण तो आरामात शोधूया असा दृष्टिकोन स्वीकारण्यासाठी माझ्याकडे वेळ नव्हता.

मी अगदी घाईगडबडीने माझ्या घरात शोधात असतांना, मला लूक १५ ची आठवण झाली – **हरवलेले मेंढरू, हरवलेले नाणे, उधळ्या पुत्र यांचा दाखला.** मी जेव्हा जेव्हा हरवलेल्या मेंढरूबद्दल वाचते तेव्हा तेव्हा मला स्वतःला प्रश्न पडतो: मेंढपाळाने नव्व्याण्णव मेंढरांना का सोडले?

(...पान ४ वर)




## एको ऑफ हिज कॉल

### *यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !*

**पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत**

**सहभागी होण्याची संधी**

*पाच मिनिटांचा संदेश*

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

✻ कृपा करुन सबक्राईब करा ✻

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**तू आपला भार यहोवावर टाक म्हणजे तो तुला आधार देईल; तो न्यायीला कधी डळमळू देणार नाही**
**- स्तोत्र ५५:२२**

येशू ख्रिस्तातील प्रियजनहो,

आपल्या प्रभु आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या गौरवशाली नावाने तुम्हा सर्वांना अभिवादन! '**एको ऑफ हिज कॉल**' च्या मागील अंकातून तुम्हाला मिळालेल्या आशीर्वादांविषयी तुम्ही ज्या प्रतिक्रिया दिल्या त्यांबद्दल आम्ही मनापासून आभारी आहोत. तुमच्या प्रार्थना, तसेच तुमचा पाठिंबा आमच्यासाठी खूप महत्त्वपूर्ण आहे आणि आम्ही त्यांचा सतत पाठपुरावा करीत असतो. प्रभु तुम्हाला भरपूर आशीर्वाद देवो!

देवाच्या अपार कृपेने, गेल्या महिन्यात **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल** कॅम्पसमध्ये अनेक सेवानिहाय कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडले, ज्यात युवा शिबिर, ओपन-एअर मीटिंग, चिल्ड्रन मिनिस्ट्रीज, चर्च ऑफ गॉड मिनिस्ट्रीज आणि आमच्या शाळेचे वार्षिक कार्यक्रम यांचा समावेश



*सेंट पॉल्स मॅट्रीक्युलेशन स्कूल कॅम्पस येथील युवा मेळावा*

होता. बालवाडीतील विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ आणि शाळेचा वार्षिक समारंभ अनुक्रमे ११ एप्रिल आणि १७ एप्रिल रोजी पार पडला. या सर्व सभांमध्ये पवित्र आत्म्याची उपस्थिती आणि मार्गदर्शन जोरदारपणे दिसून आले.




*ओपन एअर मीटिंग मध्ये पा. एस सॅम सेल्वा राज यांचे भाषण*

वेलाचेरी येथील **नहेम्या बायबल कॉलेज** कॅम्पसमध्ये चर्च ऑफ गॉड मिनिस्ट्रीज आणि चिल्ड्रन्स मिनिस्ट्रीजची झपाट्याने वाढ होत आहे. आम्हाला हे जाहीर करताना आनंद होत आहे की, एक वर्षाचा डिप्लोमा इन थिऑलॉजी प्रोग्राम २ जून २०२५ रोजी सुरू होईल, ज्यामध्ये खालील पर्याय उपलब्ध आहेत:

### (अ) निवासी (हिंदी माध्यम) - वेलाचेरी कॅम्पस

हा पर्याय आपापल्या प्रदेशात प्रभूची सेवा करण्यास इच्छुक पात्र पुरुष उमेदवारांसाठी खुले आहे. पात्र विद्यार्थ्यांसाठी प्रायोजकत्व उपलब्ध आहे.

### (ब) संध्याकाळचे बायबल कॉलेज (तामिळ माध्यम - अनिवासी)

हे वर्ग सोमवार, मंगळवार आणि गुरुवारी संध्याकाळी ६:३० ते ८:३० या वेळेत आयोजित केले जातील.

**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.



EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858
95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

**ठिकाण** : चेपॉक आणि संतोषपुरम **नहेम्या बायबल कॉलेज.**

याव्यतिरिक्त, २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून वेलाचेरी येथे तामिळ संध्याकाळचे अभ्यासक्रम सुरू होतील.

आम्ही या आध्यात्मिक शिक्षण कार्यक्रमांसाठी आपण प्रार्थनेत आठवण ठेवावी अशी नम्रपणे विनंती करतो आणि पात्र उमेदवारांशी त्यांची ओळख करुन देण्यास प्रोत्साहित करतो.

## तंत्रज्ञानाच्या (डिजिटल) स्वरूपात एको ऑफ हिज कॉल :

२०२६ पासून, आम्ही '**एको ऑफ हिज कॉल**' हे डिजिटल स्वरूपात रूपांतरित करण्याची योजना आखत आहोत कारण आम्हाला सरकारी आदेशांनुसार सुधारित उच्च पोस्टल शुल्क सहन करावे लागेल, जे आमच्या आर्थिक क्षमतेपेक्षा जास्त असेल. छपाईचा खर्च आणि स्टेशनरीच्या किमतीही वाढतच आहेत. आर्थिक अडचणींमुळे, आम्हाला हे खर्च भागवणे अधिकाधिक कठीण होत चालले आहे.

खऱ्या अर्थाने इच्छुक असणाऱ्या सर्व वाचकांना मासिक लवकरात लवकर मिळावे, यासाठी आम्ही ते सोशल मीडिया, ईमेल, व्हॉट्सअप, विशेष पोस्ट आणि कुरियर सेवांद्वारे वितरित करू.

**हा बदल सुलभ करण्यासाठी आम्ही तुम्हाला खालील तपशील पुरवण्याची विनंती करतो:**

१. तुमचा पूर्ण आणि अचूक पोस्टाचा पत्ता.

२. तुमचा सक्रिय फोन नंबर आणि व्हाट्सअप नंबर.

३. तुमचा वैध ईमेल पत्ता (उपलब्ध असल्यास).

कृपया हे तपशील योग्यरित्या सादर केले आहेत याची खात्री करा; अन्यथा, तुम्हाला भविष्यातील आवृत्त्या मिळणार नाहीत. ही अद्ययावत माहिती अशा वाचकांना लागू होत नाही, जे आधीच **एको ऑफ हिज कॉल** मिनिस्ट्रीजशी नियमित संपर्कात आहेत. आम्ही आपले आदरयुक्त नाते पुढे चालू ठेवण्यास आणि ते जपण्यास उत्सुक आहोत.

## एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजसाठी प्रार्थना विनंती :

खालील सेवांकरिता आम्ही तुमच्या प्रार्थनांची मनापासून अपेक्षा करतो.

### जोशुआ वॉरियर्स इंटरनॅशनल.

१. एक मिनिट प्रार्थना उपक्रम **(ग्लोबल व्हिजन फॉर युथ अँड कीड केअर)** - युवक आणि मुलांसाठी एक जागतिक दर्शन, दररोज रात्री १०:०० वाजता आयोजित केला जातो.

२. एक तासाची साखळी प्रार्थना - जागतिक मंडळ्यांना आणि विश्वासणाऱ्यांना समर्पित.

३. सेमिनार, शिबिरे आणि कार्यशाळा - जेणेकरून ते फलदायी आणि आत्म्याने प्रेरित होतील.

आमचे अनेक सहभागीदार आणि मिशनरी जागतिक स्तरावर सेवा करतात. आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताची सेवा करण्याच्या या मोहिमेत सामील होण्यासाठी आम्ही तुम्हाला हार्दिक आमंत्रित करतो!

## व्हेकेशन बायबल स्कूल्स (व्ही बी एस ) - मे २०२५

आपल्या आणि इतर मंडळींमध्ये या महिन्यात भरवल्या जाणाऱ्या व्हेकेशन बायबल स्कूल या विशेष वर्गांसाठी कृपया प्रार्थना करा.

*चेन्नईतील आमच्या मंडळीचे व्हीबीएस वेळापत्रक:*

१. संतोषपुरम - २५ एप्रिल ते १ मे

२. वेलाचेरी - ३० एप्रिल ते ५ मे

३. बालाजी नगर, पल्लीकरनाई - ३० एप्रिल ते ५ मे

४. चेपॉक - ६ मे ते १२ मे

बंधूंनो, आमच्यासाठी प्रार्थना करा.

त्याच्या सेवेमध्ये,

**एको ऑफ हिज कॉल परिवार.**

E.mail : sam@echoofhiscall.org

## तात्काळ पाहिजेत

**आम्हाला गुणवत्तापूर्ण, अनुभवी, निष्ठावंत, मेहनती आणि उद्देश्यपूर्ण ख्रिस्ती शिक्षकांची आवश्यकता आहे.**

**सेंट पॉल मॅट्रीक्युलेशन स्कूल,**
एको ऑफ हिज कॉल
इन्स्टिट्यूशन, विजयानगरम,
मेदावक्कम, चेन्नई- १००.

*वैयक्तिक तपशिलासह येथे अर्ज करा:*
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858




## अत्यंत महत्त्वाची सुचना!

नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे ताबडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

एको ऑफ हीज कॉल
१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६०००००५, भारत
Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org


(पान १ वरुन...)

त्याला त्यांची काळजी नव्हती काय? मला हे समजते की, हरवलेले एक मेंढरू त्याच्यासाठी मौल्यवान असायलाच पाहिजे, पण तरीही तो नव्याण्णव जणांना मागे का सोडेल? तुम्ही त्यांच्याबद्दल कधी विचार केला आहे का? **नव्यान्नव, नऊ नाणी आणि थोरला भाऊ** – ९९:९:१.

जर तुम्हीही अशाच परिस्थितीत असता, तर तुम्ही नव्याण्णव सोडून त्या एकाला शोधण्यासाठी निघून गेला असता का? तो त्यांना सोडून निघून गेला आणि तेही जंगलामध्ये. या गोष्टीमुळे मी आणखी विचारात पडले. जंगल ही सुरक्षित जागा नव्हती. तो त्यांना गोठ्यात किंवा सुरक्षित कुंपणात सोडून गेला नव्हता. ते उघड्यावर, वन्य प्राण्यांनी आणि इतर धोक्यांनी वेढलेले होते. एकाला शोधण्याच्या प्रयत्नात तो इतर नव्व्याण्णव जणांना गमावू शकला असता.

माझ्यासारखा दुसरा कोणी याबद्दल विचार केला असेल का हे मला माहित नाही. कदाचित हरवलेले ते मेंढरू अननुभवी आणि जिज्ञासू होते, काहीतरी शोध घेण्यास उत्सुक होते आणि यामुळेच ते हरवले होते. किंवा कदाचित ते बंडखोर आणि आज्ञाभंग करणारे होते, नेहमी भटकत राहणारे होते, मेंढपाळाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणारे होते.

कारण काहीही असो, तो मेंढपाळ नव्याण्णवांना उघडपणे आणि असुरक्षितपणे अरण्यात सोडून निघून जाण्यास आणि त्या एका मेंढरूच्या मागे जाण्यास तयार होता. हा विचार बऱ्याच काळापासून माझ्या मनात आहे. त्याने अशी निवड का केली याचे काहीतरी कारण असले पाहिजे.



## ९९ मेंढरांमध्ये मेंढपाळाचा विश्वास:

## १. एकात्मतेचं सामर्थ्य!

मेंढपाळ त्यांना मोकळ्या रानात मागे सोडून गेला कारण त्याला त्या ९९ जणांवर



*एकतेचे सामर्थ्य!*

प्रचंड विश्वास असावा. कदाचित त्याला माहित होते की, ते एकमेकांना आधार देण्यासाठी आहेत, एकतेमध्ये एकत्र उभे आहेत, नेहमीच एकमेकांना पाठिंबा देण्यासाठी आणि एकमेकांना राखण्यासाठी वचनबद्ध आहेत. संकटाच्या समयी ते प्रचंड शक्तीनिशी एकत्र येऊ शकतात.

मला खात्री आहे की, मेंढपाळाने त्यांना एकत्वतेच्या भावनेतून प्राप्त होणाऱ्या सामर्थ्याचे चांगले प्रशिक्षण दिलेले होते. जर एका मेंढरावर हल्ला झाला तर इतर ९८ मेंढरे सहजतेने त्याच्या मदतीला धावून येतील, त्यांच्या सुरक्षिततेसाठी ते कसोशीने संरक्षणात्मक, न डगमगता सॅमॉफरे जातील. एकतेमध्ये मोठी ताकद आहे.

मेंढपाळाला हे देखील समजले की, जो हरवलेला आहे तो असुरक्षित आहे, पूर्णपणे एकटा आहे. त्याला वाचवण्यासाठी किंवा आधार देण्यासाठी कोणीही नाही. जगण्याची शक्यता कमी आहे, केवळ बाह्य धोक्यांमुळेच नाही तर एकाकीपणाच्या दडपणामुळे देखील. एकटे राहणे हे एक धोकादायक ठिकाण आहे. म्हणूनच पवित्र शास्त्र आपल्याला एकत्र राहण्यास प्रोत्साहित करते: **आणखी मी तुम्हांस खचित सांगतो की, पृथ्वीवर जर तुम्हांतले दोघे, ते मागतील त्या कोणत्याही गोष्टीविषयी, एकमताचे होतील, तर माझ्या आकाशातील बापाकडून ती त्यांच्यासाठी केली जाईल**" (मत्तय १८:१९). "**कारण जेथे दोघे किंवा तिघे माझ्या नावाने एकत्र जमले आहेत तेथे त्यांच्यामध्ये मी आहे**" (मत्तय १८:२०). "**पाहा, बंधूंनी ऐक्याने एकत्र राहणे किती उत्तम व किती मनोरम आहे!**" (स्तोत्र १३३:१).

कधीकधी, आपल्याला असे वाटू शकते की, आपल्या मूल्यांशी एक नसलेल्या, आपल्याला समजून न घेणाऱ्या किंवा आपल्यावर खरोखर प्रेम नसलेल्या लोकांसभोवती राहण्यापेक्षा एकटे राहणे चांगले आहे. आपल्या जवळचे लोक आपला विश्वासघात करतात किंवा आपलं मन दुखावतात, तेव्हा ते विशेषकरून वेदनादायक असते, ज्यामुळे पुन्हा कोणावरही विश्वास ठेवणे कठीण होते.

प्रिय बंधू आणि भगिनींनो, जर तुम्ही हे अनुभवले असेल किंवा यामधून जात असाल, तर मी प्रार्थना करते की, प्रभू तुमच्या जखमा बऱ्या करो. येशू ख्रिस्ताने स्वतः वधस्तंभावर जाताना विश्वासघात सहन केला, आणि म्हणून तो तुमचे दुःख, मनाची द्विधावस्था आणि शंका जाणतो.

हो, या जगात लोकांवर विश्वास ठेवणे कठीण असू शकते. दुर्दैवाने, हेच एक कारण आहे की, बरेच लोक चर्चला जाण्यास संकोच करतात. जर तुम्ही तिथल्या लोकांमुळे चर्चला जाणे टाळत असाल, तर तुम्ही कृपया चर्चला जावे असे प्रोत्साहन मी तुम्हांस करू इच्छिते. हा फक्त एक सल्ला नसून ती एक देवाची आज्ञा आहे: "**आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे सोडू नये, तर एकमेकांस बोध करावा, आणि जसा तो दिवस जवळ येत आहे, म्हणून तुम्हाला दिसते तसतसा तो अधिक करावा**" (इब्री १०:२५).

देवाच्या मंडळीपासून स्वतःला दूर करू नका. लक्षात ठेवा, आपण सदोष जगामध्ये सदोष लोकांच्यामध्ये राहतो, परंतु निर्दोष व निष्कलंक देव आपल्याला प्रेम करण्याची कृपा आणि पारखण्याची बुद्धी देईल. प्रेषितांची कृत्ये १२ मध्ये, जेव्हा मंडळीने एकत्र प्रार्थना केली, तेव्हा देवाने चमत्कारिकरित्या पेत्रासाठी तुरुंगाचे दरवाजे उघडले. जेव्हा विश्वासणारे प्रार्थनेत आणि सहवासात एकत्र येतात तेव्हा मोठी शक्ती असते.

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ मे, २०२५ पासून ते १८ जून, २०२५

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

मे १९ - आमच्या मुलांसाठी असलेल्या **सुट्टीतील बायबल शाळांना** देवाने भरपूर आशीर्वादित केले म्हणून देवाची स्तुती करा.

मे २० - आमची **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेजेस** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्स,** ह्या गरजूंच्या सेवेसाठी समर्पित असल्यामुळे देवाची स्तुती करा.

मे २१ - आमच्या अनुवादकांवर, सहाय्यक संपादकांवर, समन्वयकांवर आणि त्यांच्या कुटुंबियांवर दैवी कृपा असल्याबद्दल देवाची स्तुती असो.

मे २२ - आमचे मुख्य चर्च आणि इतर चर्चच्या शाखेतील सर्व सदस्यांवरील आशीर्वादांबद्दल देवाची स्तुती असो.

मे २३ - राजकीय आणि धार्मिक विरोध असूनही आपल्या ख्रिस्ती सेवाकार्याची वाढ होत असल्याबद्दल देवाची स्तुती असो.

मे २४ - अराजकता आणि युद्धाचा धोका असताना सुद्धा सर्व राष्ट्रांना देवाने त्याचे संरक्षण प्रदान केल्यामुळे देवाची स्तुती असो.

मे २५ - प्रार्थनेत असलेले आमचे सहभागीदार, सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासातील सहभागीदार, आयुष्यभर सोबत करणारे सहभागीदार आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार, व त्यांचे सर्व कुटुंबीय यांच्यावर असलेल्या देवाच्या दयेबद्दल देवाची स्तुती असो.

मे २६ - आमच्या **पाच मिनिटांच्या युट्युब संदेशांद्वारे** सदस्यांच्या वाढत्या संख्येबद्दल व त्यांच्या साक्षींबद्दल देवाची स्तुती असो.

मे २७ - २३ मार्च २०२५ रोजी **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल**मध्ये झालेल्या आमच्या तारणाच्या सभा आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

मे २८ - आमच्या **बायबलकोर (बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्स)** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्स** यांच्या प्रभावी सेवेबद्दल देवाची स्तुती असो.

मे २९ - सेवाकार्यासंबंधी असलेल्या सर्व गरजांची देव चमत्कारिकरीत्या तरतूद करीत असल्याबद्दल देवाची स्तुती असो.

मे ३० - समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांच्या सक्षमीकरणासाठी देव मध्यस्थी करीत असल्याबद्दल देवाची स्तुती असो.

मे ३१ - आमच्या **'एको ऑफ हिज कॉल' मिनिस्ट्रीज**च्या कर्मचाऱ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे संरक्षण आणि भलाई केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

जून ०१ - **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल** आणि **नहेम्या बायबल कॉलेजम**ध्ये २०२५-२०२६ शैक्षणिक वर्षासाठी यशस्वी प्रवेश प्रक्रियेबद्दल देवाची स्तुती असो.

जून ०२ - नियमितपणे धर्मशास्त्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यामध्ये देव त्याची कृपा पुरवत असल्याबद्दल त्याची स्तुती असो.

जून ०३ - १९६९ पासून करीत असलेल्या मासिक ह्या माध्यमाच्या सेवेसंबंधी आमच्या वचनबद्धतेमुळे देवाने आम्हाला आशीर्वादित केल्याबद्दल त्याची स्तुती असो.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

जून ०४ - राष्ट्रांच्या शांतता आणि आर्थिक विकासासाठी प्रार्थना करा.

जून ०५ - आमच्या सेवेच्या विविध क्षमता आणि क्षेत्रांमध्ये विस्तार होण्यासाठी प्रार्थना करा.

जून ०६ - ख्रिस्ती लोकांनी देवाच्या वचनानुसार जगावे आणि ख्रिस्तासारखे चारित्र्य जोपासावे म्हणून प्रार्थना करा.

जून ०७ - जगभरातील ख्रिस्ती शैक्षणिक संस्थांच्या प्रतिष्ठेसाठी आणि एकात्मतेसाठी प्रार्थना करा.

जून ०८ - प्रार्थना आणि आर्थिक देणग्यांद्वारे आमचे सेवाकार्य टिकवून ठेवण्यास मदत करणाऱ्या आमच्या समर्थकांवर, हितचिंतकांवर आणि मित्रांवर देवाचा अधिकाधिक आशीर्वाद असावा यासाठी प्रार्थना करा.

जून ०९ - पृथ्वीवरील ख्रिस्ताचे राज्य पुढे नेण्यासाठी नव्या दर्शनासाठी प्रार्थना करा.

जून १० - आध्यात्मिक आणि शारीरिक धोक्यांपासून सर्व मंडळ्यांसाठी दैवी संरक्षण मिळावे म्हणून प्रार्थना करा.

जून ११ - सर्व कुटुंबांमध्ये ऐक्य आणि शांती स्थापित व्हावी म्हणून प्रार्थना करा.

जून १२ - जगभरातील टेलिव्हिजन आणि युट्युब प्रचारकांच्या अभिषेक आणि मार्गदर्शनासाठी प्रार्थना करा.

जून १३ - आमचे ज्येष्ठ पाळक एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांच्या चांगल्या आरोग्यासाठी आणि दैवी संरक्षणासाठी प्रार्थना करा.

जून १४ - जगभरातील राष्ट्रांमध्ये सर्व बाबतीत एकता आणि प्रगतीसाठी प्रार्थना करा.

जून १५ - प्रार्थनेत असलेले आमचे सहभागीदार, सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासातील सहभागीदार, आयुष्यभर सोबत करणारे सहभागीदार आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार, व त्यांचे सर्व कुटुंबीय यांच्यावर देवाची कृपा व्हावी म्हणून प्रार्थना करा.

जून १६ - आमच्या कर्मचाऱ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या चांगल्या आरोग्यासाठी आणि उन्नतीसाठी प्रार्थना करा.

जून १७ - जगभरातील राष्ट्रपती, पंतप्रधान आणि सर्व सरकारी अधिकाऱ्यांसाठी प्रार्थना करा, जेणेकरून ते शहाणपणा आणि सचोटीने देशांचे नेतृत्व करू शकतील.

जून १८ - विषाणूजन्य ताप आणि नवनवीन संसर्गजन्य रोगांपासून दैवी संरक्षण मिळावे म्हणून प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)



*देवाने पेत्रासाठी चमत्कारीत्या तुरुंगाचे दरवाजे उघडले*

प्रीती सर्व गोष्टींवर आवरण घालते, आणि आपल्याला एकमेकांची गरज आहे. इंग्रजीमध्ये एक सुंदर म्हण प्रचलित आहे, ''जर तुम्हाला वेगाने चालायचे असेल तर एकटे चाला. पण जर तुम्हाला खूप दूरपर्यंत चालायचे असेल तर कोणासोबत तरी चाला.'' तथापि, तुम्हाला कोणासोबत चालायचे आहे आणि कोणाशी सहभागिता करायची आहे हे लक्षात ठेवा, कारण ते तुमच्यावर प्रभाव पाडतील. म्हणूनच स्तोत्र १ आपल्याला आशीर्वादित होण्यासाठी काही विशिष्ट संगती टाळण्यास शिकवते. एकता आवश्यक आहे, परंतु चुकीच्या संगतीमुळे विनाश होऊ शकतो.

येशू ख्रिस्ताने एक अर्थपूर्ण प्रार्थना केली: **''जसे आपण एक आहो तसे त्यांनीही एक व्हावे, मी त्यांच्यामध्ये व तू माझ्यामध्ये, यासाठी की ते पूर्णपणे एक केले जावे''** (योहान १७:२२-२३).

हरवलेल्या एका मेंढराचा मेंढपाळाने शोध घेणे हे देवाच्या 'आमूलाग्र दयेचे' एक शक्तिशाली उदाहरण आहे, तर नव्वण्णव मेंढरे यांची पुनर्स्थापना झाली यासाठी आनंद साजरा करणारा एक मोठा समुदाय याचे ते सूचक प्रमाण आहे. जेव्हा एका मेंढराची सुटका होऊन तो माघारी येतो, तेव्हा होणारा आनंद हा ज्याची सुटका झाली त्याच्यापर्यंतच मर्यादित नसून संपूर्ण कळपासाठी असतो. यावरून आपल्याला हे शिकायला मिळते की, देवाच्या दृष्टीमध्ये प्रत्येक व्यक्ती महत्त्वाचा आहे आणि पुनर्स्थापित करणे ही एक सार्वजनिक घटना आहे - प्रत्येकाला उत्सव साजरा करण्याचे आणि इतरांना परत कळपात आणून त्यामध्ये सहभागी होण्याचे हे आमंत्रण.

## २. जागरूकतेसाठी आणि सक्रिय जीर्णोद्धारासाठी आवाहन!

मेंढपाळाला अशी अपेक्षा आहे की, नव्व्याण्णव जणांनी जागरूक आणि सावध असावे. जेव्हा कोणी दूर जाऊ लागते तेव्हा त्या व्यक्तीला प्रेमाने परत मार्गावर आणणारे सर्वप्रथ लक्षांत राहणारे ठरतात. नव्याण्णवांवर मोठी जबाबदारी असते, नाहीतर मेंढपाळाला कसे कळेल की, त्यातला एक हरवला आहे? निश्चितच, त्यापैकी किमान एकाने तरी धोक्याची घंटा वाजवली असती. कदाचित ती हरवलेल्या व्यक्तीची आई, भाऊ, बहीण, मित्र, आजी आजोबा किंवा जोडीदार असू शकते. जर ते वयस्क मेंढरू असते तर कदाचित लहान मेंढरांनी ते लक्षात घेतले असते आणि मेंढपाळाला कळवले असते.

येशू ख्रिस्त उर्वरित नव्याण्णव जणांनी जागृत राहावे अशी अपेक्षा करतो. जर तुम्ही स्वतःला नव्याण्णव जणांपैकी एक मानत असाल, तर हरवलेल्यांप्रती तुमचे कर्तव्य आहे. आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांकडे, मित्रांकडे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या मंडळीतील विश्वासणाऱ्यांकडे लक्ष दिले पाहिजे. अनेकदा आपण असे गृहीत धरतो की, आपल्या सभोवतालचे लोक त्यांच्या विश्वासात सुरक्षित आहेत, परंतु अगदी नव्व्याण्णव लोकांमध्येही काही जण भटकत असतील. सावध असा!

**जेव्हा पहारेकरी शत्रूला जवळ येताना पाहतो तेव्हा तो लोकांना सावध करण्यासाठी कर्णा वाजवतो** (यहेज्केल ३३:३-९).

त्याचप्रमाणे, नव्वद जणांच्या वचनबद्धतेमुळे आध्यात्मिक आत्मसंतुष्टता रोखण्यास आणि समाजाचे एकूण आरोग्य बळकट करण्यास मदत होते. देवाने ज्या ठिकाणी आपल्याला ठेवले आहे, एक पहारेकरी म्हणून ठेवले आहे - चला तर मग आपण जागरूक राहूया!

## ३. आत्म-संतुष्टी आणि स्व-धर्मीपण याविरुद्ध चेतावणी!

नव्याण्ण जणांमधले आपण आहोत व त्यामुळे आपण सुरक्षित आणि सुखरूप आहोत ही भावना आपल्यामध्ये आत्मसंतुष्टी आणि स्व-धार्मिकतेची वृत्ती निर्माण करू शकते. आपण कदाचित असा विचार करू शकतो, ''अरे, मी तर कळपात आहे. माझ्याकडून जे अपेक्षित आहे ते मी करीत आहे. मी मेंढपाळाचे अनुसरण करतो आणि त्याचे पालन करतो. मी भटकणाऱ्यासारखा नाही.'' तथापि, नव्यान्नव जणांची सुरक्षितता खोट्या सुरक्षेची भावना निर्माण करू शकते. कळपाचा भाग आहे

(...पान ९ वर)


नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
प्रवेशा करिता त्वरा करा ! माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
ईश्वरविद्या डिप्लोमा हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✽ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✽
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ठ पाळकांद्वारे ५५ वर्षांपासून मान्यता प्राप्त

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१३. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१४. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१५. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१६. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१७. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१८. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. इंग्रजी आणि हिंदी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२१. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२२. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२३. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२४. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२५. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२६. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२७. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार६
२८. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२९. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३०. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३१. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३२. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा)
३३. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३४. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

**केवळ भारतातील उमेदवारां करीता**

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला **'न्यु लाईफ फॉर यू'** या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज**
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

**मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी**

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

# हार मानू नका! माघार घेऊ नका!

''**आणि माझा न्यायी मनुष्य विश्वासाने जगेल, परंतु जर तो मागे हटेल, तर त्याच्याविषयी माझा जीव संतोष पावणार नाही. तथापि, नाशाकडे मागे हटणाऱ्यांपैकी आपण नाही, तर जिवाच्या तारणासाठी विश्वास धरणाऱ्यांपैकी आहो**'' - इब्री १०:३८-३९.

माझ्या सेवेच्या सुरुवातीच्या दिवसांपासून, मनुष्याच्या कोणत्याही मदतीशिवाय, मी ज्या लोकांमध्ये राहत होतो त्यांच्याकडूनच मला मोठ्या संकटांना तोंड द्यावे लागले आणि अगतिक त्रास सहन करावा लागला. अनेक निद्राहीन रात्र आणि दिवसागणिक भय यामुळे एक प्रश्न मला भेडसावू लागला, तो म्हणजे देवाने मला खरोखरच सेवेसाठी बोलावले होते की मी माझ्या स्वतःच्या इच्छेने त्यात प्रवेश केला होता.

अनेक वेळा जेव्हा मला उपासमार आणि शारीरिक हल्ले सहन करावे लागले, तेव्हा सुद्धा देव शांत राहिला. त्याने माझ्या प्रार्थनांचे उत्तर दिले नाही. अनेक प्रसंगी, त्याने मला सोडून दिले असे वाटले. पण जसजसा वेळ पुढे सरकत राहिला, तसतसे मला समजले की, त्याचे मौन देखील एक उत्तर होते - जग आणि त्याच्या लोकांबद्दल मला शिकवणारा एक धडा होता तो.

१९७९ मध्ये, येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेचा प्रचार करताना मला तीव्र विरोधाचा सामना करावा लागला. मी एका भाड्याच्या इमारतीत प्रार्थना सभा घेत होतो तेव्हा काही व्यक्तींनी माझ्याविरुद्ध खोटे आरोप करून मालकाकडे संपर्क साधला. मी तिथे आणखी सभा घेऊ नये असे त्यांनी तिला सांगितले.

मी खूप दुःखी होऊन घरी परतलो, दरवाजे बंद केले आणि माझ्या स्वयंपाकघरातील आणि बाथरूममधील सर्व पाण्याचे नळ उघडले. मी परमेश्वराला आरोळी मारीत ढसाढसा रडायला लागलो. पाण्याच्या वाहत्या आवाजाने माझे रडणे बाहेरील जगापासून मी लपवले होते. पण तरीही, देव शांत राहिला.

माझ्या जीवनाकडे पाहत असतांना, एका बाजूला मी आव्हाने आणि अडचणींना पाहिले, तर दुसरीकडे ज्या गुरुने मला सेवेत बोलावले होते, तो स्थिर उभा होता, माझ्या मदतीसाठी तो काहीएक करीत नव्हता. दरम्यान, माझे विरोधक अधिकच बळकट झाले आणि त्यांनी उघडपणे माझी थट्टा करण्यास सुरुवात केली. मी जिथे काम करीत होतो तिथेही ते सरकारी कार्यालयात घुसले, खोट्या अफवा पसरवल्या आणि माझ्या सहकाऱ्यांसमोर माझी निंदा केली.

त्यांनी माझे केलेल्या या नुकसानीमुळे मी खूप अस्वस्थ झालो होतो. माझी खूप चिडचिड झाली होती आणि भीतीने भारावून गेलो होतो. त्या दिवशी, मी हताश होऊन खूप रडून प्रार्थना केली: ''हे इस्राएलच्या परमेश्वरा, हे अब्राहाम, इसहाक आणि याकोब यांच्या देवा! मी आता तुझे मौन सहन करू शकत नाही! जर तू माझ्या वतीने कार्य करणार नाहीस तर तू कोणाची मदत करशील? जर तू माझे रक्षण करण्यास नकार दिलास तर मी कुठे जाऊ?''

तरीही, कोणतेही उत्तर नव्हते, मार्गदर्शन नव्हते, प्रेरणा नव्हती - फक्त शांतता होती. माझा आत्मा पूर्णपणे अस्वस्थ झाला होता. त्या रात्री, नैराश्येमध्ये, मी घरातील माझे सर्व सामान आणि सेवेच्या सर्व वस्तूंची बांधाबांध करून, या सर्व वस्तू मागे सोडून मी माझ्या मूळ गावी परतण्याची तयारी करीत होतो.

''... **पीडणाऱ्या तरवारीमुळे ते प्रत्येक आपापल्या लोकांकडे फिरतील व प्रत्येक आपापल्या देशांस पळून जातील**'' - यिर्मया ५०:१६.

ठीक पहाटे २:०० वाजता, कोणीतरी माझ्या दारावर ठोठावल्याचा मला आवाज आला. माझे हात थरथर कापत होते आणि मला असहाय्य आणि घाबरल्यासारखे वाटत होते. शेवटी, जेव्हा मी भीतभीत दार उघडले तेव्हा एक पांढऱ्या दाढीचा वृद्ध माणूस खांद्यावर एक पिशवी लटकवलेली आणि अन्नाचे एक पुडके घेऊन उभा होता.

मी विचारले, ''तुम्ही कोण आहात? आणि ह्या अवेळी कशासाठी तुम्ही आला आहात?'' मी माझ्या मूळ गावी परतण्याची तयारी करीत होतो कारण देवाने माझ्या प्रार्थना ऐकल्या नव्हत्या असेही मी त्यांना सांगितले. तथापि, रात्री उशिरा ते माझ्या घरी आले होते आणि अशा परिस्थितीत शेजाऱ्यांनी कोणताही चुकीचा अर्थ लावू नये म्हणून मी त्यांना आत मध्ये घ्यावे अशी त्यांनी मला विनंती केली. मी त्यांना अनिच्छेने आत घेतले.

ते म्हणाले, ''माझ्या मुला सॅम, मी तुझा मित्र, पास्टर जे.एस. डॅनियल आहे. आपण शेवटचे भेटलो त्याला बराच काळ लोटलेला आहे आणि म्हणून कदाचित तू मला विसरला आहेस. शहरात माझे सेवाकार्य संपवून मी माझ्या गावी परतत होतो, पण माझी शेवटची बस चुकली. माझ्याकडे टॅक्सी भाड्याला सुद्धा पैसे नव्हते, आणि ही एक रात्र काढण्यासाठी या शहरात माझ्याकडे दुसरे कोणते ठिकाण नव्हते. चेन्नईतील माउंट रोडवरून चालत असताना, देव माझ्याशी बोलला आणि आज रात्री तुझे ठिकाण शोधण्यासाठी मला स्पष्टपणे निर्देशित केले. तू हे ठिकाण सोडून जाऊ नकोस. तुझा देव, ज्याने तुला सेवेसाठी पाचारण केले, तो शांत आहे असे तू समजू नको; तुझ्या चांगल्या उद्यासाठी तो जोमाने तुझी तयारी करीत आहे. तुझ्या आयुष्यात तू काहीतरी मोठे साध्य करावेस म्हणून तो तुला धारदार बनवत आहे. तुला जसे वाटते तसा तो शांत नाही. लक्षात ठेव, **सुवार्ता यरुशलेमेतून पाठवली जात आहे** (यशया २:३, मीखा ४:२). हे शहर तुझं यरुशलेम आहे, आणि म्हणून तू हे शहर सोडून जाऊ नकोस.''

त्यांच्या शब्दांचा मान राखण्याशिवाय माझ्याकडे दुसरा पर्याय नव्हता, मात्र मला त्याक्षणी प्रभूचे प्रेम जाणवले आणि माझ्यासारख्या

नम्र सेवकाच्या जीवनात तो ज्या चमत्कारिक पद्धतीने कार्य करतो ते मी पाहिले. पास्टर डॅनियल आणि आपला प्रभू येशू ख्रिस्त या दोघांचीही मी माफी मागितली आणि मग मी माझे सेवाकार्य चालू ठेवले. देवाने मला आशीर्वाद दिला. काही महिन्यांनंतर, त्याने मला दुसऱ्या ठिकाणी नेले जिथे मी एक यशस्वी सेवक बनू शकलो.

प्रिय मित्रा, ज्या परमेश्वराने तुला बोलावले आहे तो तुला विसरला आहे असे तुला वाटते का? तुझ्या व्यवसायाची वाढ खूपच मंद आहे आणि म्हणून आपण आपला व्यवसाय बदलावा किंवा आपण दुसऱ्या ठिकाणी निघून जाणे चांगले आहे असे तुला वाटते का? नाही, तुम्ही असे करू नये. ज्याने तुम्हाला त्याच्या सेवेकरिता बोलावले आहे तो विश्वासयोग्य आहे. जरी तुम्ही सर्वस्व गमावले असले तरी, तुमचे भविष्य अजूनही अबाधित आहे. म्हणून चमत्कार होईल या आशेने तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवा; निश्चितच, तुमच्या आयुष्यात काहीतरी चांगले घडेल!

''**तू यहोवाची प्रतीक्षा कर, दृढ ऐस, व तुझे हृदय धीर धरो; होय तू यहोवाची प्रतीक्षा कर**'' - स्तोत्र २७:१४.

(पान ६ वरुन)

म्हणून एखादी व्यक्ती आध्यात्मिकदृष्ट्या निर्भय किंवा स्वयंपूर्ण होत नाही.

हा दाखला अशा धार्मिक लोकांना आव्हान देतो, जे कदाचित असा विचार करू शकतात की, ''मला पश्चात्तापाची गरज नाही.'' किंबहुना, हा दाखला अशा लोकांना ही आठवण करून देतो की, देवाची कृपा सर्वांसाठी उपलब्ध आहे, अगदी सुरक्षित दिसणाऱ्यांसाठी देखील. देवाचे वचन सांगते,

''**सर्वांनी पाप केले आहे, आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत**'' (रोम ३:२३). अशाप्रकारे, बाकीचे नव्वदजण हे आपल्याला आत्मसंतुष्टता किंवा अभिमानाबद्दल आपल्या स्वतः च्या हृदयाचे परीक्षण करण्यास प्रोत्साहित करतात.

''**ज्याला असे वाटते की, आपण उभे आहो, त्याने पडू नये म्हणून सांभाळावे**'' (१ करिंथ १०:१२).

प्रिय मित्रहो,

जे मेंढरू हरवले त्याला शोधणाऱ्या मेंढपाळाचे मी मनापासून कौतुक करते, तर नव्व्याण्णववांवर असलेल्या त्याच्या आत्मविश्वासाबद्दल मी तितकीच आभारी आहे. जरी ते सुरक्षित असले तरी, येशू ख्रिस्त त्यांना सुरक्षिततेच्या खोट्या भावनेत अडकू नये असे आव्हान करतो. कळपातील त्यांचे असलेले स्थान हे त्यांच्यासाठी एक दान आहे, जे टिकवून ठेवण्यासाठी नम्रतेची आणि निरंतर पश्चात्तापाची आवश्यक आहे हे त्यांनी ओळखावे. त्यांची भूमिका ही विश्वासणाऱ्यांना सुद्धा नियमित नूतनीकरण आणि देवाच्या कृपेवर अवलंबून राहण्याची आवश्यकता आहे याची एक जिवंत आठवण करून देणारी आहे.

त्या नव्याण्णव जणांनी त्या एकासाठी प्रार्थना केली पाहिजे!

******


**URGENT NEED for CHRISTIAN OFFICE**

**1. COMPUTER OPERATORS**

**2. PRINTING PRESS OPERATORS**

**Contact : (+91) 98412 71858, E.mail : sam@echoofhiscall.org**


**NOTICE**

Please store the Mobile Phone numbers (+91) 98410 71858, (+91) 98412 71858 of Pastor S. Sam Selva Raj on your mobile phones. - Editor

## एको ऑफ हिज कॉल YouTube LIKE COMMENT

## प्रतिदिन भक्ती संबंधित प्रतिसाद!



ब्र. शशी तिवारी



सिस्टर मेरी सूसान



ब्र. स्टीफन रामना



ब्र. शॉल बेंजामिन शिंदे

i) **ब्र. स्टीफन रामना**, साऊथ आफ्रिका

व्वा, आज सकाळचा किती सामर्थ्यशाली संदेश! मी धन्य झालो.

ii) **ब्र. शशी तिवारी**, मुंबई

प्रोत्साहित करणार्या भक्तिपर संदेशासाठी तुमचे आभार. प्रतिदिन भक्तीपर उपासनेसाठी आणि अनुवादकासाठी मी निरंतर प्रार्थनेत आठवण ठेवतो.

iii) **ब्र. शॉल बेंजामिन शिंदे**, पालघर

प्रेज द लॉर्ड पास्टर. मी नियमितपणे यूट्यूब वर तुमचे संदेश ऐकत असतो. तुमच्या संदेशाद्वारे देव मला आशिर्वादित करतो. देवाची स्तुती असो. देवबाप तुम्हाला अधिक आशिर्वाद देवो.

iv) **सिस्टर मेरी सूसान**, विझाग

युट्यूब वरील सकाळच्या उपदेशांसाठी तुमचे आभार. मी खरोखरच आशिर्वादित झाले.

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
**Please subscribe**

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.

**- Editor**

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

| | |
|---|---|
| Branch | : **Triplicane, Chennai-5** |
| Name | : **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : **1023 2934 679** |
| IFSC | : **SBIN 00 00 249** |
| SWIFT CODE | : **SBI NIN BB 455** |

### *2. Bank : ICICI Bank*

| | |
|---|---|
| Branch | : **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : **Echo of His Call** |
| A/C No. | : **6038 0502 2319** |
| IFSC | : **ICIC 000 6038** |

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | |
|---|---|
| Branch | : **Triplicane, Chennai-5** |
| Name | : **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : **1023 2923 805** |
| IFSC | : **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS Patrika Channel"**
**on 13th MAY 2025.**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

## *JESUS LOVES YOU!*

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**